आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
९ डिसेंबर २०२५ - मंगळवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- देशातलं अन्नधान्य उत्पादन यंदा ३५ कोटी ७ लाख टनांवर जाईल असा अंदाज असल्याचं केंद्रीय कृषीमंत्र्यांचं लोकसभेत निवेदन

- इंडिगो कंपनीने नियमित विमान उड्डाणांच्या संख्येत पाच टक्के कपात करावी असे डीजीसीए चे निर्देश

- शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर विरोधक आक्रमक, विधानभवनाच्या पायऱ्यांवर आंदोलन

आणि

- भारत विरुद्ध दक्षिण आफ्रिका पाच सामन्यांच्या टी-ट्वेंटी क्रिकेट मालिकेतला पहिला सामना आज ओदिशात कटक इथं रंगणार

**<><><><><>**

देशातलं अन्न धान्य उत्पादन यंदा ३५ कोटी ७ लाख टनांवर जाईल असा अंदाज असल्याचं आज केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंग चौहान यांनी लोकसभेत प्रश्नोत्तरांच्या तासात सांगितलं. ही वाढ गेल्या वर्षीच्या तुलनेत ७ पूर्णांक ६५ शतांश टक्के तर 2014-15 मधे झालेल्या उत्पादनाच्या तुलनेत बेचाळीस टक्के असल्याचं त्यांनी नमूद केलं.

**.... होल्ड- बाईट- शिवराज सिंग चौहान - -**

महाराष्ट्र, पंजाब, जम्मूकाश्मीर, उत्तराखंड आणि हिमाचल प्रदेश या राज्यांमध्ये आलेल्या नैसर्गिक आपत्तींमुळे धान्य उत्पादनात घट झाल्याचं त्यांनी स्पष्ट केलं.

**<><><><><>**

डाव्या कट्टरतावादाच्या विरोधात सरकारनं कठोर धोरण अवलंबलं असून पुढच्या मार्चपर्यंत त्याचं समूळ उच्चाटन करायचं ध्येय ठेवलं आहे. असा पुनरुच्चार सरकारनं आज केला. ही समस्या सोडवण्यासाठी केंद्र सरकार, राज्यांसोबत काम करत आहे, असं प्रतिपादन गृहराज्यमंत्री नित्यानंद राय यांनी लोकसभेत पुरवणी प्रश्नाच्या उत्तरात केलं. यासाठी राज्यांना सीएपीएफच्या तुकड्या पुरवण्यात आल्याची माहितीही त्यांनी दिली.

तसंच, पुरेशा प्रशिक्षण सोयीसुविधा आणि ७०६ पोलीस स्थानकांच्या उभारणीला मान्यता दिल्याचंही राय यांनी सांगितलं.

लोकसभेत आज निवडणूक सुधारणांच्या मुद्यावर चर्चा होणार आहे. तर राज्यसभेत वंदे मातरम् च्या शतकोत्तर सुवर्णमहोत्सवानिमित्त चर्चा सुरु आहे.

<><><><><>

देशातली नागरी हवाई सेवा झपाट्यानं पूर्वपदावर आणली जात आहे असं स्पष्टीकरण केंद्रीय नागरी हवाई वाहतूक मंत्री के राम मोहन नायडू यांनी आज लोकसभेत बोलताना दिलं. विमानसेवेतल्या अनियमितेबाबत केंद्रीय हवाई वाहतूक संचालनालयानं इंडिगो कंपनीला नोटीस बजावली आहे, कंपनीच्या खुलाशानंतर योग्य आणि कडक कारवाई केली जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली. प्रवाशांची सेवा आणि सुरक्षा याला सर्वोच्च प्राधान्य देण्याच्या दृष्टीनं नागरी हवाई वाहतूक नियमात बदल केले जातील, असं ते म्हणाले. प्रवाशांना पुढच्या बुकींगसाठी शुल्क आकारलं नसून आतापर्यंत साडेसातशे कोटींहून जास्त परतावा देण्यात आल्याचं त्यांनी नमूद केलं.

<><><><><>

इंडिगो कंपनीची विमानउड्डाणं रद्द झाल्यानं ३ तारखेपासून नागरी हवाईसेवेत झालेल्या खोळंब्याच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय हवाई वाहतूक संचालनालयानं इंडीगो विमान कंपनीला त्यांच्या वेळापत्रकात विमान उड्डाणांमध्ये पाच टक्के कपात करण्याचे निर्देश दिले आहेत. विशेषतः अधिक मागणी आणि अधिक वारंवारता असलेल्या उड्डाणांसाठी हे निर्बंध लागू होतील असं संचालनालयानं म्हटलं आहे. हवाई वाहतुकीसंबधित विभागानं कंपनीला उद्या संध्याकाळी पाच वाजेपर्यंत सुधारित वेळापत्रक दाखल करायला सांगितलं आहे.

देशातल्या विमानउड्डाणांची सद्यस्थिती आणि प्रवाशांशी संबधित सेवांबाबतचा आढावा घेण्यासाठी विमानतळांना प्रत्यक्ष भेट देण्याचे निर्देश नागरी विमान वाहतूक मंत्रालयानं वरिष्ठ अधिकाऱ्यांना आज दिले. नागरी विमान वाहतूक मंत्री के. राम मोहन नायडू यांनी घेतलेल्या उच्चस्तरीय आढावा बैठकीत हे निर्देश देण्यात आले. अधिकाऱ्यांना या भेटीत आढळलेल्या त्रुटी तसंच प्रवाशांच्या प्रतिक्रिया घेऊन ताबडतोब कारवाई करायला सांगितल्याचं मंत्रालयानं समाजमाध्यमावर म्हटलं आहे.

<><><><><>

महाराष्ट्र विधिमंडळ हिवाळी अधिवेशनाच्या आजच्या दुसऱ्या दिवशी सकाळी विरोधकांनी विधानभवनाच्या पायऱ्यांवर बसून आंदोलन केलं. कर्जमाफीचं आश्वासन देऊनही शेतकऱ्यांची कर्जमाफी झाली नाही, सोयाबीन खरेदी केंद्र सुरू झाली नाहीत, कापसावरील  आयात कर शून्य करून परदेशातला कापूस आयात केला जात आहे, अशी टीका विरोधकांनी केली. राज्यात दिवसाला ८ शेतकरी आत्महत्या करत असून सरकारचं धोरण शेतकरीविरोधी आहे, अशी टीका करत विरोधी पक्षाच्या सदस्यांनी विधानभवनाच्या पायऱ्यांवर घोषणाबाजी केली.

फलटण येथील महिला डॉक्टरच्या आत्महत्या प्रकरणात आरोपपत्र दाखल करण्यात येईल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज विधानसभेत दिली. प्रश्नोत्तराच्या तासात एका प्रश्नाला उत्तर देताना ते बोलत होते. या प्रकरणातला पुढील तपास करण्यासाठी न्यायाधीशांची चौकशी समिती स्थापन करण्यात आली आहे, तसंच महिला पोलीस अधिकाऱ्याच्या नेतृत्वाखाली पोलीस तपास करतील असं त्यांनी स्पष्ट केलं.

राज्यात इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी ६५ वसतीगृहं असून इतर जिल्ह्यांमधे वसतीगृहासाठी जागा संपादित केली जात आहे, अशी माहिती फडनवीस यांनी दिली. काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी यासंदर्भातला प्रश्न विचारला होता.

राज्यातल्या सर्व शासकीय कार्यालयांमधे आणि विभागांमधे युनिक डिसॅबिलीटी आयडी कार्ड सादर करणं आजपासून सक्तीचं करण्यात आल्याची माहिती मागासवर्ग आणि बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी सभागृहात सांगितलं.

<><><><><>

राष्ट्रीय लोकशाही आघाडी – एनडीएच्या संसदीय पक्षाची बैठक आज नवी दिल्लीच्या संसद भवन संकुलात झाली.  प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, केंद्रीय गृह मंत्री अमित शाह, संरक्षण मंत्री राजनाथ सिंग, भाजपा अध्यक्ष जे. पी. नड्डा,  तसंच रालोआचे सर्व खासदार बैठकीला उपस्थित होते. बिहार विधानसभा निवडणुकीतल्या विजयाबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं अभिनंदन बैठकीत करण्यात आलं. देशाच्या विकासाकरता अधिक जोमाने काम करण्याचं आवाहन प्रधानमंत्र्यांनी सर्व खासदारांना केलं. सर्वसामान्य माणसाचं जीवन

सुलभ आणि सुखकर बनवण्यासाठी सर्व क्षेत्रात चौफेर सुधारणांची गरज असल्याचं त्यांनी सांगितलं, अशी माहिती संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू यांनी दिली. …

**- होल्ड - बाईट- रिजिजू - -**

<><><><>

वर्ष २०२३ आणि २०२४ साठीचे राष्ट्रीय हस्तकला पुरस्कार राष्ट्रपती द्रौपदी यांनी आज नवी दिल्लीत वितरित केले. विविध हस्तकला प्रकारांमध्ये उल्लेखनीय कामगिरी केलेल्या एकंदर ४८ जणांना राष्ट्रपतींनी सन्मानित केलं. या क्षेत्रामुळे विशेषतः ग्रामीण भागात ३२ लाखापेक्षा जास्त रोजगार निर्माण होत असल्याची बाब राष्ट्रपतींनी यावेळी अधोरेखित केली.

<><><><>

महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची मतमोजणी २१ डिसेंबरला होणार असल्यानं महाराष्ट्र लोकसेवा आयोगानं आगामी दोन संयुक्त पूर्वपरीक्षांच्या वेळापत्रकात बदल करण्यात आला आहे. गट ब अराजपत्रित संयुक्त पूर्वपरीक्षा आधी २१ डिसेंबर रोजी होणार होती, ती आता ४ जानेवारी रोजी होणार आहे. तर गट ३ संयुक्त पूर्वपरीक्षा ११ जानेवारी रोजी घेण्यात येणार असल्याचं आयोगाच्या पत्रकात म्हटलं आहे.

<><><><>

भारत विरुद्ध  दक्षिण आफ्रिका पाच सामन्यांच्या टी-ट्वेंटी क्रिकेट मालिकेला आजपासून सुरुवात होत आहे. सलामीचा सामना आज संध्याकाळी सात वाजता ओडिशातल्या कटक इथल्या बाराबती मैदानावर खेळण्यात येणार आहे. यामालिकेतील दुसरा सामना गुरुवारी चंदीगडच्या मुल्लानपूर इथं तर तिसरा सामना धर्मशाळा इथं, चौथा सामना लखनऊमध्ये आणि शेवटचा सामना अहमदाबादच्या नरेंद्र मोदी मैदानावर होईल.

<><><><>

आयपीएलच्या २०२६च्या हंगामासाठीचा लिलाव १६ डिसेंबर रोजी अबुधाबीत होणार असून यात भाग घेणाऱ्या खेळाडूंची अंतिम यादी बीसीसीआयनं प्रसिद्ध केली आहे. एकंदर २४० भारतीय आणि ११० परदेशी खेळाडू यात सहभागी होतील. २०२६च्या आयपीएलमध्ये ७७ खेळाडूंसाठी जागा उपलब्ध असून त्यातल्या ३१ परदेशी खेळाडूंसाठी आहेत. आत्तापर्यंत १७३ खेळाडूंचं विविध संघांतलं स्थान निश्चित झालं आहे.

आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
९ डिसेंबर २०२५ - मंगळवार

<><><><><>

ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते आणि कष्टकरी आणि श्रमिकांचे आधारस्तंभ डॉ. बाबा आढाव यांचं काल पुण्यात वार्धक्यानं निधन झालं. ते ९५ वर्षांचे होते. काही दिवसांपासून त्यांच्यावर उपचार सुरू होते. बाबा आढाव यांचा पार्थिव देह आज अंत्यदर्शनासाठी पुण्यात हमाल भवन इथं ठेवण्यात आला असून संध्याकाळी ४ वाजता अंत्यसंस्कार करण्यात येतील. बाबा आढाव यांनी शेतमजूर, हमाल आणि असंघटित कामगारांच्या हक्कासाठी आजीवन संघर्ष केला. हमाल पंचायत या संघटनेची स्थापना करुन त्यांना सामाजिक सुरक्षितता मिळवून देण्यासाठी ते कार्यरत होते. जातीभेदाविरुद्ध एक गाव एक पाणवठा ही चळवळ त्यांनी संपूर्ण राज्यात राबवली.

संपूर्ण आयुष्य कष्टकरी श्रमिकांच्या हक्कांसाठी, समाजासाठी वेचणारे बाबा आढाव यांच्या निधनाबद्दल सर्व स्तरातून हळहळ व्यक्त होत आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे, ज्येष्ठ नेते शरद पवार, लोकसभेतले विरोधी पक्ष नेते राहुल गांधी, राज्यसभेतील विरोधीपक्षनेते मल्लिकार्जुन खरगे आणि काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी बाबा आढाव यांच्या निधनाबद्दल तीव्र दु:ख व्यक्त केलं आहे.

//<><><><><>//